मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता.वसई, जि.पालघर, पिन-४०१ ३०५.

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

दुरध्वनी : ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५०-२५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जा.क्र. :
दिनांक :

# निविदा सुचना क्र. ०२

वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती 'सी', विद्युत विभागातील खालील कामाकरिता उत्पादक, अधिकृत विक्रेते व इच्छुक पुरवठादार यांच्याकडुन बी-२ नमुन्यात व्दिलखोटा पध्दतीनुसार महानगरपालिकच्या अटी व शर्तीस अधीन राहून मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाचे कोरे निविदा फॉर्म दि. ०५ / १० /२०१८ पासुन ते दि. २०/१०/२०१८ पर्यत सुटटीचे दिवसाखेरीज प्रभाग समिती 'सी', विद्युत विभागात कार्यालयीन कामकाजाचे वेळी रोखीने विकत मिळतील. सदर कामांची इसारा रक्कम आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका या नावे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी लागेल व सदर डिमांड ड्राफ्ट लखोटा क्र. १ सोबत जोडावा लागेल. डिमांड ड्राफ्टद्वारे इसारा न भरलेल्या, खाडाखोड करुन स्वाक्षांकित न केलेल्या, मुदतीत न आलेल्या व सर्शत निविदा नाकारण्यात येतील. सदर कामी पुर्णपणे भरलेल्या मोहरबंद निविदा दि.२२/१०/२०१८ पासून ते दि. २७/१०/२०१८ पर्यत प्रभाग समिती 'सी' विद्युत विभागात देण्यात यावे. प्राप्त निविदा या सहा.आयुक्त, प्रभाग समिती 'सी' कार्यालय यांच्या दालनात हजर निविदाधारक अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी समक्ष त्याच दिवशी अथवा इतर सोयीच्या दिवशी उघडण्यात येतील.

| अ. क्र | कामाचा तपशिल | अंदाजपत्रकिय रक्कम | १% निविदा इसारा रक्कम | निविदा फॉर्मची फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (सी) चंदनसार सर्वे नं. १६ मधिल बहुद्देशिय इमारत दुसरा मजला येथील सभागृहात ध्वनी प्रक्षेपण यंत्रणा बसवुन कार्यान्वित करुन १ वर्ष देखभाल दुरुस्ती करणे. | रु.३,००,०००/- | रु. ३,०००/- | रु.२००/- +१२% GST<br>२२४/- | मंजुर घटकाच्या दरानुसार होणाऱ्या अंदाजित रक्कमेवर २ % डि.डि. ने व २ % बिलातुन | ३६ महिने |

१) मॅन्युअल पध्दतीने फॉर्म खरेदीची अंतिम दि.२०/१०/२०१८ रोजी पर्यंत राहील.
२) कोरे निविदा फॉर्मची मागणी करतेवेळी अर्जा सोबत विद्युत विभागाच्या नोंदणी प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
३) ठेकेदाराने निविदा भरताना गुडस् ॲण्ड सर्विस टॅक्स (GST) चा विचार करुन निविदा दर भरावे.
४) ठेकेदारांनी निविदा भरताना, निविदा फॉर्म मध्ये नमुद केल्याप्रमाणे तांत्रिक बाबींची आवश्यक कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये तसेच वित्तीय बाबींची आवश्यक कागदपत्रे लिफाफा क्र. २ मध्ये असणे आवश्यक आहे. निविदा फॉर्म मध्ये नमुद असले प्रमाणे कागदपत्रे लिफाफा क्र. १ मध्ये नसल्यास लिफाफा क्र.२ उघडला जाणार नाही.
५) मुदतीत प्राप्त झालेली निविदा दि.२७/१०/२०१८ रोजी अथवा इतर सोयीच्या दिवशी उघडण्यात येतील.
६) मॅन्युअल पध्दतीच्या निविदेमध्ये काही शंका असल्यास त्याचे निरसन प्रभाग समिती सी (विद्युत विभाग) कडून करुन घ्यावे.
७) कोणतीही एक अथवा सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा.आयुक्त,वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

जावक क्र. : ववशिम/प्रससी/विवि/६६/१८-१९
दिनांक : ०५/१०/२०१८

सही/-
अति.आयुक्त
वसई-विरार शहर महानगरपालिका